# आम्ही पार्लेकर

१९९१ पासून

प्रतिबिंब बदलत्या पार्ल्याचे

वर्ष ३१ वे | अंक आठवा | पृष्ठे १२ | ऑगस्ट २०२२ | www.parlekar.com

Registered-RNI no. 54781/92



या अंकात

पान ०२ राम मंदिर मार्ग !

पान ०६ नाविकांचे स्मारक

पान ०८ आमची शाळा - रचनाशास्त्रातील सौंदर्याविष्कार

पान १० हॉटेल ताज महाल

पान ९ सुरेल कलाप्रवास अर्चना गोरे




# मेरा भारत महान

## युटयुब मालिकेला उत्तम प्रतिसाद

यंदा आपण आपल्या भारताच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करत आहोत. त्या निमित्ताने 'मेरा भारत महान' ही हिंदी मालिका 'यु ट्युब' चॅनेल वर जुलै २०२२ पासून प्रसारित होत आहे. वीरमाता अनुराधा गोरे, डॉ. मंजू मंगल प्रभात लोढा आणि नीला रवीन्द्र या तिघींनी मिळून प्रस्तुत केलेल्या या मालिकेत भारताचा गौरवशाली इतिहास सांगितला जाणार आहे 'आजपर्यंत आम्हाला जो इतिहास सांगितला गेला तो काहीवेळा चुकीचा तर काही वेळा अर्धवट सांगितला गेला. त्यामुळे विस्मृतीत गेलेला किंवा न सांगितलेला इतिहास, राजे राजवाडे, सामान्य जनता - त्यांनी केलेला उठाव आणि आमचा विजय त्याचप्रमाणे आमचे स्थापत्य, संगीत, कला, विज्ञान, विद्यापीठे, गुरुकुल, नौदल या सगळ्यांबद्दलची माहिती लोकांपर्यंत पोचवण्याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत. हा उपक्रम करत असताना आमच्या डोळ्यासमोर आहे नवीन युवा पिढी. आपण कोण होतो आणि कोण आहोत हे कळल्यावर इतिहासातील चुका टाळून एक आकांक्षांनी भरलेला भारत आपण निर्माण करू शकू आणि त्यासाठी सगळ्यांनी एकत्र येऊन, एक होऊन पुढे गेले पाहिजे' अशी निर्मात्यांची भूमिका आहे. या मालिकेत दोन देशभक्तीपर कवितांचा समावेश 'थीम साँग' प्रमाणे केला आहे.






ह्या मालिकेला सर्व थरांतून उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे नीला रविंद्र ह्यांनी 'आम्ही पार्लेकर' शी बोलताना सांगितले.

**१) अमर जवान गीत: आईए हम सब याद करें अपने वीर जवानोंको ।**

**गीत: डॉ. मंजू मंगलप्रभात लोढा**

**संगीत: शशांक कट्टी.**

**गायक: गौरी भिडे मेहेंदळे, निहार शेंबेकर, मंदार आपटे**

**२) गौरव गीत: हाँ मैं भारत हूँ ।**

**गीत: डॉ. मंजू मंगलप्रभात लोढा**

**संगीत, गायक: निहार शेंबेकर**







## संपादकीय

गेले काही दिवस अमेरिकेत सिएटल येथे वास्तव्य आहे. दिवसभर शहरात तसेच इतरत्र भटकंती व रात्री थोडे काम असा काहीसा संथ दिनक्रम सुरु आहे. यानंतर बृहन् महाराष्ट्र मंडळाच्या अटलांटिक सिटी येथील अधिवेशनाला हजेरी लावून भारतात परतणार आहे.

भारताबाहेर गेलो की आपण सतत त्या ठिकाणाची व भारताची, मुंबईची व पार्ल्याचीही तुलना करत असतो व ते सहाजिकच आहे. येथे अपार्टमेंटमधील कोणी एकमेकाला ओळखत नाही, अगदी शेजारी कोण रहाते हे सुद्धा माहित नसते. स्वत:चे घर असले तर प्रश्नच मिटला. आपण बरे की आपले काम बरे. त्यामुळे सामाजिक प्रभावाचा (चांगल्या व वाईटही) पूर्णपणे अभाव आहे. एका अर्थी आपल्याला हवे तसे मुक्त, स्वच्छंदी जीवन येथे लोकं अनुभवतात. स्वत:ची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी जिवापाड मेहेनत करतात. खूप पैसे कमवतात आणि तेवढेच खर्चही करतात. मात्र काही समस्या उद्भवली, संकट आले तर भावनिक आधाराच्या अभावाने त्यांना काहीसे एकटे पडल्यासारखे वाटत असावे अशी माझी समजूत आहे. नाही म्हणायला प्रत्येक समुहाच्या, गटाच्या संस्था तिथेही असतात ज्यायोगे मर्यादित स्वरुपात सहजीवन शक्य होते.

अजुन एक निरीक्षण म्हणजे सार्वजनिक आयुष्यात सर्व नियमांचे, कायद्याचे काटेकोरपणे पालन. येथे वाहन चालवताना सिग्नल तोडणे तर राहोच पण कोणी लेन सुद्धा सोडत नाहीत. आखून दिलेल्या जागेवरच पार्किंग केले जाते. वाटेल तिकडे कचरा टाकणे, रस्त्यावर थुंकणे ह्या गोष्टी अजिबात नाहीत. सर्व प्रेक्षणीय स्थळांची, ऐतिहासिक वास्तूंची, आस्थापनांची देखभाल अत्यंत व्यवस्थित व पर्यटकस्नेही. अमेरिकेत एक गंम्मत आहे, येथे सर्वच जण बाहेरुन आलेले. युरोप, आशिया, आफ्रिका, साऊथ अमेरिका, असे जगभरातून लोकं येथे येतात त्यामुळे कोणीच कोणाला 'हा देश तुझा नाही' असे म्हणू शकत नाही.

यंदा आपण देशाच्या स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत आहोत. आपणा सर्वांनाच देशासाठी काहीतरी करावे असे वाटत असते. आपले जवान देशाच्या सीमांचे रक्षण करुन मातृभूमीची सेवा करतात. आपण काही सीमेवर लढायला जाऊ शकत नाही, मग आपण नागरिक काय करु शकतो ? पार्ल्यापुरते बोलायचे झाल्यास, जर आपण कचरा व्यवस्थापनात शिस्त आणली, वहातुकीचे, पार्किंगचे नियम काटेकोरपणे पाळले, सार्वजनिक जीवनात कायद्याचे, नियमांचे पालन केले, आपल्या संस्थांनी लोकाभिमुक कार्यक्रम, उपक्रम राबवले तर पार्ल्यातील जनजीवनाचा स्तर खचितच उंचावेल व ही सुद्धा एक मोठी लोकसेवा व पर्यायाने देशसेवा ठरेल.

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

आम्ही पार्लेकर

**संपादक**
ज्ञानेश चांदेकर

**संपादकीय सहाय्य**
रश्मी मावळंकर
अवंती मांडवकर
editorial@parlekar.com

**जाहिरात व्यवस्थापन**
भावेश शिंदे
marketing@parlekar.com

**सजावट व मांडणी**
विश्वास महाशब्दे – ऐस ग्राफिक्स

**निर्मिती**
अनिता चांदेकर

www.facebook.com/AamhiParlekar http://aamhiparlekarblog.wordpress.com
कार्यालय : १, अल्फा, महात्मा गांधी मार्ग, विलेपार्ले (पूर्व), मुंबई-४०००५७.
फोन : २६१२२४७५ / २६१९२३७६ / ई-मेल : info@parlekar.com वेबसाईट www.parlekar.com

## हिंदुस्थानमधील अनेक थोर नेते, थोर समाजसेवक, कलावंत आणि मोठमोठे लेखक यांच्या पदस्पर्शाने पावन झालेला
# राम मंदिर मार्ग !

जानेवारीमध्ये आपण सुरू केलेला विलेपार्ल्यातील मार्गांच्या ओळखीचा हा उपक्रम आज आठव्या महिन्यात पदार्पण करीत आहे.

या प्रवासामध्ये माझा एक मोठा वैयक्तिक फायदा झाला आहे आणि तो असा की, पार्ले नगरीतील बऱ्याच महामहीम जनांची माझ्याशी ओळख झाली आहे.

बऱ्याच लोकांनी फोन करून हा अभिनव उपक्रम आवडल्याचे सांगितले, तर बऱ्याच लोकांनी आत्तापर्यंत माहीत नसलेल्या गोष्टी या लेखांवरून माहीत झाल्याचे कळवले. तर काही जागरूक मंडळींनी लेखामध्ये नसलेल्या, परंतु त्यांना माहीत असलेल्या गोष्टी आवर्जून कळवण्यासाठी फोन केले. इतिहासाच्या कसोटीवर हे लेख शंभर टक्के उतरणार नाहीत, त्यांच्यामध्ये काही त्रुटी राहू शकतात याची मला नम्रपणे जाणीव आहे. त्यामुळे वाचक मंडळींना पुन्हा एकदा अशी विनंती आहे की लेखांमध्ये त्यांना काही त्रुटी आढळल्या किंवा काही अधिक माहिती हवी होती असे वाटल्यास त्यांनी अवश्य आमच्याशी संपर्क साधावा. विलेपार्ल्यातील मार्गांवर लेख लिहिण्याची कल्पना 'आम्ही पार्लेकर'चे संपादक श्री ज्ञानेश चांदेकर यांची, हे येथे आवर्जून नमूद करणे आवश्यक आहे. ज्ञानेश धन्यवाद.

मंडळी यावेळी आपण पार्ल्यातील एका अशा मार्गाची माहिती करून घेणार आहोत की ज्याने विलेपार्ले मधील स्वतंत्रता चळवळीचा आणि स्वातंत्र्योत्तर सामाजिक घडामोडींचा जवळजवळ संपूर्ण इतिहास बघितला आहे, कारण या मार्गावर आहे, आपले ऐतिहासिक सांस्कृतिक आणि सामाजिक केंद्र- लोकमान्य सेवा संघ!

या मार्गाचे नाव आहे राम मंदिर मार्ग! नाही, काहीही चूक नाही! लोकमान्य सेवा संघाच्या



द्वारासमोरील रस्त्याचे नाव टिळक मंदिर मार्ग नसून राम मंदिर मार्गच आहे! टिळक मंदिर मार्ग हा टिळक मंदिरच्या मागच्या बाजूला आहे. बऱ्याच मंडळींचा, अगदी माझा सुद्धा, आत्तापर्यंत हा घोटाळा व्हायचा की लोकमान्य सेवा संघाच्या वास्तूच्या समोरील रस्त्याला टिळक मंदिर मार्ग हे नाव आहे असेच मला वाटायचे!

राम मंदिर मार्ग हा नेहरू मार्गापासून सुरू होतो आणि पुढे महात्मा गांधी मार्गाला ओलांडून पुढे जाऊन लगेच डावीकडे वळतो आणि पुढे चित्तरंजन मार्गाला मिळतो. पार्ल्यातील अनेक छोट्या रस्त्यांपैकी हा एक महत्त्वाचा छोटा रस्ता!

राम मंदिर मार्गाचे नाव ज्या मंदिरावरून पडले ते श्रीराम मंदिर, श्री विष्णू विश्वनाथ उपाख्य काका गोखले यांनी १९१३ मध्ये बांधले. पार्ल्यामध्ये प्रारंभीच्या काळात जी मंडळी दक्षिण आणि मध्य मुंबईतून स्थलांतरित झाली त्यामध्ये काका गोखले होते. गावामध्ये मंदिर नाही ही भावना त्यांना सतत सलत होती. मंदिर निर्माण कार्यासाठी त्यांनी पार्ले हिंदू देवालय मंडळ स्थापन केले आणि त्या अंतर्गत पार्लेश्वर मंदिर





बांधण्यात आले. परंतु आपल्या घराशेजारी एखादे मंदिर असावे असे गोखले काकांना सतत वाटायचे. त्यासाठी त्यांनी स्वत:ची जमीन विनामूल्य देऊन स्वखर्चाने हे मंदिर बांधण्याचा निश्चय केला. नंतर या उपक्रमास इतर लोकांनीही सहकार्य केले. अशा प्रकारे चैत्र शुद्ध पंचमी शके १८३५, सन १९१३ या दिवशी श्रीमत जगद्गुरु शंकराचार्य, मठ संकेश्वर, यांच्या उपस्थितीत डॉक्टर सीताराम काशिनाथ गोखले यांच्या हस्ते श्रीराम, लक्ष्मण, सीता, मारुती, श्री गणेश व महादेव यांच्या मूर्ती नुकत्याच बांधलेल्या राम मंदिरामध्ये स्थापित करण्यात आल्या.

मंडळी, तेव्हा विलेपार्ले येथे दगडी चाळ नावाची वास्तु होती हे ऐकून तुम्हाला आश्चर्य वाटेल.! ही दगडी चाळ या राम मंदिराच्या जवळच होती. विलेपार्ल्यातील पहिला सार्वजनिक गणेशोत्सव या राम मंदिरातच आयोजित केला गेला होता.

याच मार्गावर डाव्या हाताला राम मंदिर तर उजव्या हाताला दत्तात्रय अँड सन्स या नावाचे लांजेकरांचे सोन्या-चांदीचे दुकान गेली कित्येक

पान ३ वर

**GOLDEN GATE TO IIT**
*"Making your dreams come true since 2005"*

- **Target 2024 batch for std. X students** (ICSE, CBSE, IGCSE, SSC)
- A 2 year Online/Offline/Hybrid Group Tuition Programme from May 2022
- **Tri-pillar foundation** (Tried and tested pedagogy technique!)
  - **Sound Fundamentals**: Learn the concepts & their application
  - **Sufficient Practice**: Practice over and over till you achieve mastery
  - **Skill development**: Time & stress management, fault analysis etc.
- **Selected batch of 35** Don't feel lost in the crowd anymore!
- **Mentored 400+ students** to excel in academics since 2005
- **Single programme** for JEE (Adv. + Main), BITSAT, CET & XI, XII (HSC)
- **Guidance to choose among top-notch institutes** like IIT, NIT, IISER, BITS, DAIICT, ICT, VJTI, SPCE, SPIT, DJS, KJS & many others

Our Top Scorers : 2020 Batch
Our Top Scorers : 2019 Batch




Our Faculty




**Contact**: Mr. Prashant 7039679129/ 9004607404, Dr. Kapadi 9867244891
Prof. Karmarkar 9930198249, Prof. Antarkar 9820651068
**Address**: Golden Gate to IIT, 107/B, Hemu Arcade, Vile Parle West, Mumbai, 400056

पान २ वरून

## हिंदुस्थानमधील अनेक थोर नेते....

दशके उभे आहे. हे दुकान श्री दत्तात्रय लांजेकर यांनी सुरू केले. श्री दत्तात्रय लांजेकर हे अत्यंत धडपडे आणि हरहुन्नरी गृहस्थ होते. त्यांच्या डोक्यामध्ये सतत काही ना काही व्यवसाय करायचे विचार सुरू असत. त्यांच्याविषयी एक सुरस कथा आम्हास कळली आहे. ते कुठेही जाताना सतत एक पिशवी स्वत:बरोबर बाळगत. त्यामध्ये प्लंबिंगची हत्यारे आणि होमिओपॅथिक औषधे अशा दोन परस्पर विरुद्ध गोष्टी ठेवलेल्या असत! लोकमान्य सेवा संघाचे ते उत्साही कार्यकर्ते होते.

येथेच पार्ल्यातील जुने (आणि कदाचित पहिलेही) शशिकांत केशकर्तनालय आहे. श्री मधुकर जाधव यांनी १९२८-३० च्या सुमारास पार्ल्यात येऊन काही काळातच हे दुकान चालू केले. मधुकर जाधव हे राष्ट्रीय वृत्तीचे होते. पार्ल्यामध्ये राजकीय शिक्षणाबरोबरच प्रौढ शिक्षणाचे काम करणारी एक संस्था होती. त्यामध्ये अत्यंत कष्टाने मधुकर जाधव यांनी थोडेफार शिक्षण घेतले. जाधव साहेबांच्या नंतर त्यांचे वंशज अजूनही हे दुकान समर्थपणे चालवीत आहेत.

राम मंदिर रस्त्यावर राम मंदिरापासून पुढे टिळक मंदिराच्या डाव्या बाजूला वळून गेले की पुढे डाव्या बाजूला एक बंगले वजा घर आहे. ते घर आहे मुंबई विश्व विद्यापीठाच्या माजी कुलगुरू सौ स्नेहलता देशमुख यांचे! पार्ल्यामध्ये राहणाऱ्या महामहीम मंडळींपैकी सौ स्नेहलता देशमुख या एक.

तसेच पुढे, प्रार्थना समाज रस्ता ओलांडून गेले की डाव्या बाजूला महालक्ष्मी मंदिर आहे. हे मंदिर श्री शंकर सिद्धेश्वर कुंटे व त्यांच्या पत्नी श्रीमती गंगाबाई कुंटे यांनी जागा विकत घेऊन १९३४ साली बांधले. मंदिरामध्ये श्री महालक्ष्मी, श्री महासरस्वती व श्री महाकाली अशा तीन मूर्ती आहेत. त्यांची प्रतिष्ठापना शंकराचार्य डॉक्टर कुर्तकोटी यांच्या हस्ते झालेली आहे.




या राम मंदिर मार्गाची एक सुरस कथा आहे. १९४९ पर्यंत हा रस्ता कच्चा, खडबडीत होता. त्यावर्षी लोकमान्य सेवा संघाचा रौप्य महोत्सव होता आणि काकासाहेब गाडगीळ आणि इतर मोठे राजकीय आणि शासकीय पुढारी येथे येणार होते. त्यामुळे वेगात चक्रे फिरली आणि एका रात्रीत राम मंदिर रस्ता डांबरी झाला!

राम मंदिर रोडवरील विलेपार्ल्याच्या, गेल्या एक शतकाच्या इतिहासाची साक्षीदार असलेली अत्यंत महत्त्वपूर्ण आणि समस्त पार्लेकरांच्या जिव्हाळ्याचा आणि अभिमानाचा विषय असलेली वास्तू म्हणजे लोकमान्य सेवा संघाची वास्तु!

लोकमान्य यांच्या महापरिनिर्वाणानंतर लगेचच लोकमान्य यांचे सार्वजनिक स्मारक म्हणून लोकमान्य सेवा संघ पार्ले या नावाची संस्था स्थापन करण्यात यावी असे टिळक स्मारक फंडाच्या नोव्हेंबर १९२२ मधील सभेमध्ये ठरवण्यात आले. लोकजागृती आणि लोकहित या टिळकांच्या दोन कार्यविशेषांवर आधारित संघाची उद्दिष्टे ठरवण्यात आली आणि केवळ एका वर्षातच म्हणजे १९२३ मध्ये लोकमान्य सेवा संघ अस्तित्वात सुद्धा आला! स्वातंत्र्यपूर्व काळात ही संस्था म्हणजे स्वातंत्र्य सैनिकांचे प्रेरणास्थान आणि आधारस्थान ठरली होती! स्वदेशी चळवळ असो की मिठाचा सत्याग्रह असो किंवा 'चले जाव'ची चळवळ असो, लोकमान्य सेवा संघाचा या प्रत्येक गोष्टीमध्ये कोणत्या ना कोणत्या कारणास्तव सहभाग राहिला आहे. लोकमान्य सेवा संघामध्ये महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशामधील मोठमोठे नेते आणि लेखक आणि समाजसेवक यांनी कोणत्या ना कोणत्या कारणास्तव उपस्थिती लावली आहे. अगदी अलीकडेच आपले लाडके पंतप्रधान श्रीमान नरेंद्र मोदी यांनी सुद्धा गणेशोत्सवाच्या निमित्ताने लोकमान्य सेवा संघाला भेट दिली होती.



त्या दृष्टीने, देशातील कितीतरी महत्त्वाच्या व्यक्तींचे पाय राम मंदिर मार्गाला लागले आहेत आणि हा मार्ग धन्य झाला आहे!

**दादासाहेब दापोलीकर**
९९६७८४०००५




| क्रम | योजना कलावधी | दरमाहा गुंतवणूक | सवलत | विमोचन रक्कम | विमोचनायोग्य उत्पादने |
|---|---|---|---|---|---|
| १ | ३६० दिवस | १०००/- | १२०० | १२,२००/- | डायमंड / प्लॅटिनमचे दागिने |
| २ | ३६० दिवस | १०००/- | १००० | १२,०००/- | सोन्याचे दागिने / २३ कैरेट वळी |
| ३ | ३६० दिवस | १०००/- | ७५० | ११,७५०/- | २४ कैरेट कॉईन (नाण) |

# QR कोड

वस्तूंच्या किमती दाखविणारे बार कोड्स आपल्या सर्वांना माहिती आहेतच. अलीकडे म्हणजेच गेल्या काही वर्षात बारकोडच्या पुढील अवताराचा उगम झाला आहे. याला क्यू आर कोड असे म्हणतात. क्यू आर कोड म्हणजेच क्विक रिस्पॉन्स कोड.

QR कोडने, कोविड-१९ महामारीच्या जोरावर, व्यवसायांना ग्राहकांशी संवाद साधण्याचा एक नवीन टच-फ्री मार्ग दिला. आदरातिथ्य आणि अन्नापासून ते किरकोळ उत्पादनापर्यंत, विविध कंपन्यांनी प्रथमच त्यांचा वापर केला.

QR कोड (क्विक रिस्पॉन्स कोड) चा शोध १९९४ मध्ये डेन्सो वेव्ह (जपानी ऑटोमोटिव्ह कंपनी) च्या मुख्य अभियंता मासाहिरो हारा यांनी लावला आणि अल्पावधीतच अनेक क्षेत्रात QR कोड वापरले जाऊ लागले. यामध्ये पांढऱ्या पार्श्वभूमीवर स्क्वेअर ग्रिडमध्ये काळ्या चौकोनांचा समावेश असतो, जो मोबाईल कॅमेराद्वारे वाचता येतो आणि त्या प्रतिमेचा योग्य अर्थ लावला जाऊन ती माहिती (डेटा) मोबाईलच्या स्क्रीनवर प्रकट होते.

व्यवहारात, QR कोडद्वारे अनेक प्रकारची माहिती उदा. आकृत्या, तक्ते, सूचना इ. देता येऊ शकते. QR कोड मोबाईलने scan केला असता संबंधित माहिती किंवा वेबसाइट उघडली जाते. (बारकोड वापरताना काही मर्यादा येत होत्या. मुख्य म्हणजे बारकोड वाचण्यासाठी विशिष्ट प्रकारचा स्कॅनर आवश्यक असतो.) QR कोड वाचण्यासाठी स्कॅनरची आवश्यकता नसल्यामुळे क्यू आर कोडचा वापर प्रचंड मोठ्या प्रमाणात केला जाऊ लागला आहे. २०१७ मध्ये जेव्हा Apple ने QR रीडर त्याच्या फोनमध्ये समाविष्ट केले आणि इतर मोबाईल उत्पादकांनी त्वरीत त्याचे अनुसरण केले तेंव्हापासून QR कोड वापराची खरी प्रगती झाली. मोबाईलचा वापर सर्वत्र वाढल्यामुळे हे शक्य झाले आहे.

उपयोग :

१) तुम्ही LinkedIn प्रोफाइलवर निर्देशित करण्यासाठी तुमच्या व्यवसाय कार्डाच्या मागील बाजूस QR कोड ठेवू शकता.

२) बिलबोर्डवरील QR कोड तुम्हाला लँडिंग पृष्ठावर पाठवू शकतो.

३) पुस्तके नोट्स इत्यादी आता क्यू आर कोड स्वरुपामध्येच दिली जातात. यामुळे कागदाची प्रचंड प्रमाणात बचत होते आणि म्हणून क्यू आर कोड वापरणे हे पर्यावरण पूरक आहे.

विनामूल्य डाउनलोड: व्यवसाय आणि विपणनासाठी QR कोड कसे तयार करावे आणि कसे वापरावे यासाठी अनेक स्वरूपांची माहिती इंटरनेटवर मिळू शकते.

थोडक्यात बोलायचे म्हणजे क्यू आर कोड ने आपल्या जीवनामध्ये एक क्रांती घडवून आणली आहे.

**प्रा. दिलीप हुंडीवाले व**
**प्रा. यु. आर. कापडी**
९८६७२ ४४८९१

# स्वातंत्र्यसैनिक

## हा कार्यक्रम आता युट्युबवर उपलब्ध

विलेपार्ल्यातील साथसंगत महिला मंडळ, दर वर्षी पारल्यातील इतर सर्व महिला मंडळांना आमंत्रित करून वेगवेगळ्या कल्पना घेऊन एका छोटेखानी सोहळ्यात मराठी दिन साजरा करते. कोविड मुळे गेली दोन वर्षे ऑनलाईन मराठी दिन साजरा केला. या वर्षी, स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल, 'स्वातंत्र्यसैनिक' हा विषय घेऊन, ७५ जणींनी एकेक स्वातंत्र्यसैनिकाची थोडक्यात माहिती सांगून १ ते २ मिनीटांचा व्हिडिओ करून पाठवावा ही कल्पना सौ. चित्राताई मेहेंदळे यांनी मांडली. पार्ल्यातील सर्व मंडळांच्या सदस्यांनी ही कल्पना उचलून धरली. एक एक स्वातंत्र्यसैनिक निवडून, त्यांची माहिती मिळवून उत्साहाने स्वत:चे व्हिडिओ तयार करून चित्राताईंकडे पाठवले. बऱ्याच ज्येष्ठ मैत्रिणींनी आयुष्यात पहिल्यांदा असा स्वत:चा व्हिडिओ तयार केला होता. हे सारे व्हिडिओज् संकलित करून you tube वर टाकण्यात आले आहेत. ह्यात ४० च्या वर 'मराठी' सैनिकांची माहिती आहे.

पुढील लिंकवर ते पहाण्यास उपलब्ध आहेत. सर्वांनी जरूर पहावेत. संकल्पना आणि सादरीकरण सौ. चित्रा मेहेंदळे.

https://youtube.com/playlist?list=PLHVloS5bmjagEWRx5iV8DYFVmybbq69

ही संपूर्ण कार्यक्रमाची लिंक आहे.

जरूर पहा. अभिप्राय लिहा, शेअर करा, चॅनेल सबस्क्राइब करा..

नविन पिढीला स्वातंत्र्य सैनिकांची माहिती व्हावी ह्या हेतूने हा उपक्रम करण्यात आला. अशी आगळी कल्पना घेऊन येणाऱ्या चित्राताई आणि त्यांना साथ देणाऱ्या विलेपार्ल्यातील मैत्रिणी यांचं मन:पूर्वक कौतुक.





साजिरी

खुशखबर ! खुशखबर ! खुशखबर !
ऑगस्ट महिन्यापासून नव्याने भिशीची नोंदणी सुरू झाली आहे.
आतापर्यंत 1000 पेक्षा जास्त सख्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.
या योजनेत सहभागी व्हा आणि मनपसंत साड्या मिळवा.
जुलै महीन्यात 10 सख्यांची नोंदणी झाली आहे.
हसत रहा साजिरी संगे सजत रहा!!

Deepa Lele -Cheulkar 9867088877
Madhura Gokhale 9892240800

A-5 Kadamgiri CHS, near MacDonald
Hanuman road, vile Parle East, Mumbai :-400057




बाप्पाचा थाट, त्याला सोन्याचा साज
शुध्द सोन्याचे दागिने आणि अलंकारीक वस्तु
जानकी ज्वेलर्स
सी. ए. पेंडुरकर
आणि कं
विलेपार्ले पूर्व
११, कामदार शॉपींग सेंटर, रेल्वे स्टेशन समोर, विलेपार्ले पूर्व. फोन: ९३२१४ ५०९५४ | ९३२१७ ८५६३२
शोरुम वेळ: स.११ ते रात्रौ ८ | सोमवार बंद

# नाविकांचे स्मारक

देशोदेशी

मी युरोप बद्दल फारसं काही ह्या सदरात आतापर्यंत लिहिलं नव्हतं. त्याचं मुख्य कारण म्हणजे युरोप तसा आपल्या जास्त परिचयाचा प्रदेश आहे. आपल्यापैकी अनेक लोकं युरोपचा प्रवास करून आलेले आहेत, कित्येक युरोपमध्ये दीर्घकाळ राहिलेले आहेत. त्यामुळे मला आधी वाटलं की ज्याबद्दल आपल्याला बरीच माहिती आहे अश्या ठिकाणांबद्दल लिहिण्यात किंवा वाचण्यात फारसं हशील नाही. पण मग वाटलं की माझ्या युरोपमधल्या प्रवासांत जे काही थोडं वेगळं काहीतरी पाहायला /अनुभवायला मिळालं त्याबद्दल तरी ह्या आणि ह्याच्या पुढील २-३ लेखात लिहावं.

साधारण सोळाव्या शतकाच्या सुरुवातीपासून ते एकोणिसाव्या शतकाच्या शेवटापर्यंत, छोट्याश्या युरोपमधील राज्यांनी सर्व जगावर सत्ता गाजविली. स्पेन, इंग्लंड, फ्रान्स, हॉलंड सारख्या प्रमुख सत्तांपासून ते अगदी बेल्जियम सारख्या नखभर आकाराच्या देशांपर्यंत सर्वांनी. ह्या जगड्व्याळ साम्राज्यांचा पाया मात्र घातला गेला होता स्पेन आणि पोर्तुगालमधील महत्वाकांक्षी नाविकांच्या पंधराव्या शतकातील सप्तसमुद्र पालथे घालणाऱ्या धाडसी सागरी मोहिमांमुळे.

ह्या मोहिमांचा इतिहास अतिशय रोमांचक आहे. मात्र तो वाचताना आणि त्याचं शिल्परूपातील लिस्बन मधील स्मारक न्याहाळताना माझ्या मनात एक मोठा प्रश्न उभा राहिला तो हा - ह्या चित्तथरारक मोहिमांच्या फक्त १००-१५० वर्षांच्या कालखंडात अशी काय जादू होती की ज्या देशाने त्या काळाच्या आधी किंवा नंतरही कुठल्याही प्रकारे लक्षणीय असं फारसं काहीही केलेलं दिसत नाही, त्या पोर्तुगाल सारख्या एका लहानश्या देशाने सप्तसमुद्रांवर (स्पेन सोडला तर निरंकुश) राज्य केलं ?

कदाचित ह्या प्रश्नाचं उत्तर लिस्बन ह्या पोर्तुगालच्या राजधानी मधील तागुस नदीच्या काठावरील नाविकांच्या स्मारकात दडलेलं असेल. ह्या स्मारकाचं अधिकृत नाव जरी Padrão dos Descobrimentos - शब्दश:, 'शोधांचे स्मारक' असलं तरी मुख्यत: हे पोर्तुगालच्या दर्यावर्दींनी लावलेले 'शोध' युरोपला अज्ञात असलेल्या जगातील वेगवेगळ्या प्रदेशांचे असल्यामुळे, माझ्या मते त्याला त्या धाडसी नाविकांचंच स्मारक म्हणणं जास्त योग्य आहे.

मी खरंतर लिस्बनला गेलो होतो माझ्या कामासाठी. पण काम अपेक्षेपेक्षा लवकर संपल्यामुळे पुढची कोपेनहेगनची फ्लाईट पकडण्याआधी एक भाकड दिवस हातात होता. मग मी हॉटेलच्या रिसेप्शनिस्टच्या मदतीने एक वयस्क आणि लिस्बनचा स्थानिक ड्राइव्हर शोधून त्याची टॅक्सी दिवसभराकरिता ठरविली. कारण आजकाल अशा मोठ्या शहरात टॅक्सीवाले बहुतेक बाहेरून कुठून तरी आलेले असतात आणि त्यांना गूगल मॅप्सच्या मदतीने एका ठिकाणाहून दुसरीकडे जाण्याखेरीज शहराची काही माहिती असेलच ह्याची खात्री देता येत नाही.

गाडीत बसल्यावर मी त्याला सांगितलं, ''पुन्हा मी ह्या तुझ्या गावात येईन की नाही कुणास ठाऊक, तेंव्हा मला कायम आठवणीत राहतील अश्या जागी तू घेऊन जा". माझा टॅक्सीवाला सर्वात आधी मला घेऊन गेला ह्या नाविकांच्या स्मारकापाशी. मी विचारलं "का रे बाबा, इथेच तू का सर्वप्रथम आलास ?". तो म्हणाला "कारण आमच्या इतिहासातील सुवर्ण काळाचं हे स्मारक आहे". मी विचारलं "तुमचा सुवर्ण काळ तर ह्याच्या पुढच्या शतकात आला. कारण तेंव्हा पोर्तुगालचं साम्राज्य ब्राझील पासून पूर्वेला मकाऊ आणि पूर्व इंडोनेशियातील बेटांपर्यंत पसरलं, आणि ह्या सर्व प्रदेशातून सोन्याची गंगा पोर्तुगालकडे वाहायला लागली". त्यावर तो म्हणाला "तू म्हणतोस त्या काळात पोर्तुगालमध्ये कधी न पाहिलेली श्रीमंती आली असेलही पण सर्व जगात कोणीही न केलेली नेत्रदीपक कामगिरी आमच्या धाडसी खलाश्यांनी ज्या काळात केली, तोच माझ्या मते सर्व पोर्तुगीजांना गर्व वाटावा असा काळ आहे आणि जरी स्पॅनिश लोकांनी कितीही बढाया मारल्या तरी त्यांच्या सागरी मोहिमेतील सर्वात महत्वाच्या दोन मोहिमांचे कप्तान - कोलंबस आणि मॅजेलान (ज्याच्या गलबताने सर्वात प्रथम पूर्ण पृथ्वीप्रदक्षिणा केली) सुद्धा मुळात पोर्तुगीजच होते ".

अर्थात कोलंबस खरंच कुठला होता - स्पॅनिश, इटालियन की पोर्तुगीज ह्याबद्दल बरेच वाद आहेत आणि ऐतिहासिक महत्वाच्या व्यक्ती 'आपल्याच' आहेत असा दावा करून आपलं महत्व वाढवायचा प्रयत्न करण्याचा प्रघात जगातील सर्वच समाजात असतो! कारण कोलंबस आणि मॅजेलान दोघांना त्यांच्या आयुष्यात देशद्रोहीच समजलं गेलं. (त्यांनी स्पेनच्या झेंड्याखाली आपल्या सागरी मोहिमा काढल्या म्हणून).

नाविकांच्या ह्या स्मारकाचं अधिकृत उदघाटन झालं ऑगस्ट १९६० मध्ये हेनरी द नॅव्हिगेटर ह्याच्या ५०० व्या पुण्यतिथीचा मुहूर्त साधून. कारण पोर्तुगालच्या ह्या सुवर्ण-काळाचा प्रमुख शिल्पकार हेनरीच होता. प्रिन्स हेनरी हा पोर्तुगालचा तत्कालीन राजा जॉन ह्याचा चौथा मुलगा. तो नुसताच राजवाड्यात बसून हुकूम सोडणारा राजपुत्र मात्र नव्हता. त्याचा मोहिमांमध्ये प्रत्यक्ष सहभाग आणि नेतृत्व, आर्थिक पाठिंबा, त्याच्यामुळे मिळालेलं राजसत्तेचं संरक्षण आणि त्याची दूरदृष्टी हयामुळे पोर्तुगालमध्ये सागरी मोहिमांना विशेष प्रतिष्ठा प्राप्त झाली. त्याने एक संपूर्ण गावच वसवलं. तिथे उभरत्या नाविकांना योग्य ते शिक्षण, सागरी मोहिमांना उपयुक्त अशा Cartography (नकाशे पद्धतशीरपणे बनविण्याचं शास्त्र) आणि Navigation (नौकानयनशास्त्र) ह्यांचं संशोधन, जहाजे बांधण्याच्या वेगवेगळ्या रचनांचे प्रयोग असे अनेक उद्योग स्वखर्चाने चालू केले. त्यातूनच एका बाजूला Caravel सारखी त्याकाळातील सर्वात वेगवान जहाजं निर्माण झाली, आणि दुसऱ्या बाजूला बार्थोलोम्यु डियास, पेद्रो काब्राल, पेद्रो एस्कोबार, मार्टीम डी सोसा, वास्को द गामा असे प्रशिक्षित आणि निडर नाविक एकामागून एक बाहेर पडून सात समुद्र पालथे घालू लागले.

ह्या सर्व नाविकांचे (अल्बुकर्क आणि संत झेवियर्स सारखे काही थोडे ज्यांनी नाविक नसूनही इतर कारणांसाठी काही महत्वाच्या सागरी मोहिमांत भाग घेतला) पुतळे ह्या स्मारकावर उभारलेले आहेत. लिस्बनच्या बेलेम विभागात तागुस नदीच्या काठावर Caravel जहाजाच्या नाळेच्या आकाराचा एक लाइमस्टोनचा भव्य (५२ मीटर उंच) स्तंभ उभारून त्या नाळेवर सर्वात पुढे प्रिन्स हेनरीचा आणि त्याच्या मागे दोन्ही बाजूला १६-१६ असे ३२ प्रमुख दर्यावर्दींचे प्लास्टरचे पुतळे आहेत. **पहा पहिले तीन फोटो.** त्या समोरच्या चौकात एक विस्तीर्ण होकायंत्राची आकृती आहे (हे साऊथ आफ्रिकेने पोर्तुगालला सदिच्छा भेट म्हणून दिलेलं आहे). ज्यात जगातील वेगवेगळ्या ठिकाणी जाणारे जे सागरी मार्ग





पोर्तुगीज नाविकांनी शोधले ते रेखाटलेले आहेत. त्याचा फोटो मात्र घेणं शक्य नव्हतं. कारण जमीनीपासून २०-२५ फूट तरी उंचावर गेल्यावरच ते होकायंत्र पूर्णपणे दिसू शकतं इतकं ते मोठं आहे.

स्मारक बघून मी गाडीकडे जायला मागे वळलो आणि दोन गंमती समोर दिसल्या. पहिली - सॅन फ्रान्सिस्कोच्या बे ब्रिजची हुबेहूब प्रतिकृती असा तागुस नदीवरचा पूल (कारण दोन्हीचा

पान ७ वर






पान ६ वरून

## नाविकांचे स्मारक



आर्किटेक्ट एकच होता) आणि दुसरी - रिओ द जानेरो मधल्या कोरकोव्हाडो टेकडी वरच्या ख्राईस्ट द रीडीमर ह्या पुतळ्याची नक्कल (कदाचित ब्राझील पोर्तुगीज साम्राज्याचा एकेकाळी भाग होता त्याची आठवण म्हणून ? ?). पहा पुढचे दोन फोटो.



एकूणच लिस्बन फार छान शहर आहे. लिस्बनच्या रस्त्यातून फिरताना फार मजेचा अनुभव सारखा येतो - घरांवरच्या आणि गल्ली बोळांच्या पाट्यांवर डिसा, डिसोझा, मेनेझिस, मस्कारेन्हास अशी गोव्यात दिसावी अशी नावे दिसत राहतात! असो. त्याचा अर्वाचिन भाग जगातल्या सर्व आधुनिक शहरांसारखाच काँक्रीटच जंगल असला तरी मूळ गाव अजून आपलं अठराव्या शतकातील व्यक्तिमत्व टिकवून आहे. पहा शेवटचा फोटो. त्या एका



भेटीनंतर काही पुन्हा लिस्बनला जायचा योग्य आला नाही - पण तिथल्या जिभेवर विरघळणाऱ्या जेवणाची आणि संध्याकाळी रॉसियोच्या चौकातली दिव्यांची रोषणाई उजळल्यावर, तिथल्या कारंज्याच्या काठावर बसून चाखलेल्या जिंझाची (चेरीपासून बनविलेली पोर्तुगीज liqueur - ज्याला दारू म्हणणं हा त्याचा घोर अपमान आहे) चव अजून जिभेवर रेंगाळत आहे.

**तळटीप :** ह्या लेखासोबतचे फोटो मात्र फारसे चांगले नाहीत. माझी ही बिझनेस ट्रिप असल्यामुळे मी माझा कॅमेरा बरोबर नेला नव्हता. सगळे फोटो त्यामुळे मोबाइल फोनच्या कॅमेऱ्याने काढलेले आहेत. तेही १३ वर्षांपूर्वीच्या 'पुरातन' मोबाइल फोनवर - जेंव्हा फोटोत काहीतरी जरा रंगीबेरंगी दृश्य दिसलं कि समाधान मानायची प्रथा होती.

**सतीश जोशी**
९८२०२२८२७९

## 'साहित्य नक्षत्रे' चे दिमाखात प्रकाशन

**'साहित्य नक्षत्रे'** या डॉ. मेधा सिधये (पूर्वाश्रमीच्या भानुमती दातार) यांच्या पुस्तकाचे प्रकाशन २८ मे २०२२ रोजी पुणे येथे डॉ.राजा दीक्षित, (अध्यक्ष मराठी विश्वकोश मंडळ, संपादक 'नवभारत') यांच्या शुभहस्ते



झाले. प्रमुख पाहुणे आणि वक्ते होते प्राध्यापक मिलिंद जोशी, (कार्याध्यक्ष म. सा.प.पुणे), श्री. वामन पंडित, (अध्यक्ष वसंतराव आचरेकर प्रतिष्ठान आणि संपादक, 'कनक रंगवाचा') कणकवली, श्री.रविप्रकाश कुलकर्णी (साहित्यिक पत्रकार व ज्येष्ठ लेखक). या प्रकाशन समारंभाचे सूत्रसंचालन सुप्रसिध्द निवेदिका सौ.शैला मुकुंद यांनी केले.

**'साहित्य नक्षत्रेचे'** प्रकाशक आहेत 'गमभन प्रकाशन', पुणेचे श्री. ल. म. कडू. हे गमभन प्रकाशन २००२ पासून 'साहित्य वैभव' ही दिनदर्शिका प्रकाशित करते. त्यात सहा दिवंगत साहित्यिकांची कृष्णधवल छायाचित्रे आणि त्यामागे त्यांच्या साहित्यिक योगदानावरील १००० शब्द मर्यादेपर्यंतचे उत्तम



लेख असतात. या दिनदर्शिकेचे संपादन २००३ पासून आजतागायत डॉ. मेधा सिधये करीत आहेत. त्यात लिहिलेल्या त्यांच्या २७ लेखांचा हा संग्रह आहे. यात काशीबाई कानिटकर ते सुधीर मोघे यांच्या पर्यंतचे कथाकार, नाटककार, कवी, समीक्षक यांचा समावेश आहे. या सर्व लेखकांचे वाङ्मयीन कर्तृत्व आणि साहित्याला त्यांचे असलेले योगदान या लेखांमधून व्यक्त झाले आहे. प्रत्येकाच्या जन्म निधनाची नोंद आणि ठळक साहित्यकृतींची यादीही दिलेली आहे. सर्वसामान्य वाचक, अभ्यासक, विद्यार्थी, वर्ग शिक्षक, प्राध्यापक यांना आवडेल आणि उपयुक्त ठरेल असे हे अल्पाक्षरी अर्थबहुल रसस्वादयुक्त समीक्षणपर लेखन आहे. वाचकांसाठी लोकमान्य सेवा संघ ग्रंथालय, विलेपार्ले येथे या पुस्तकाची प्रत लवकरच उपलब्ध होईल. तसेच हे पुस्तक 'बुकगंगा.कॉम' कडे उपलब्ध आहे.

## संगीत उपचार पध्दती ! (Music Therapy)

संगीत आणि मन यांच नातं दृढ आहे. आपल्या मनातील प्रत्येक भावना, त्याची तीव्रता किंवा management संगीताद्वारे सहज शक्य आहे. आपण जेव्हा आनंदी असतो तेव्हा ह्या संगीतात आपला हा आनंद द्विगुणीत करण्याची ताकद असते तर एखाद्या दु:खद प्रसंगातून गेल्यावर संगीत किंवा त्या संगीतातील शब्दांतून आपले मन मोकळे होते.

गेल्या काही वर्षांपासून बदललेली जीवनशैली, वाढलेली स्पर्धा, सततची चिंता, वाढलेल्या कामाच्या वेळा, आहाराची अनियमितता, कौटुंबिक वादविवाद या सर्वांमुळे मधुमेह, रक्तदाब, ताणतणाव, निद्रानाश, निरुत्साह यासारख्या रोगांनी अनेकांना ग्रासलं आहे. तसेच कॅन्सरसारख्या आजारांच्या उपचारांदरम्यान होणारे side effects या सगळ्यांवर औषधोपचार करुनही काहींना त्यांतून दिलासा मिळत नाही. परंतु आता 'संगीत उपचार पध्दती' ही पूरक पध्दती फायदेशीर ठरत आहे. संगीत हे मनाची प्रसन्नता वाढवतं. संगीतातील शब्द आणि सूर आपल्या मेंदूमध्ये आनंदलहरी निर्माण करणाऱ्या हार्मोनच्या व निर्मितीला उत्तेजन देतात. म्युझिक थेरपीद्वारे गर्भसंस्कार : आई व तिच्या पोटातील बाळ या दोघांच्या मानसिक आणि शारिरीक वृध्दीसाठी संगीतोपचाराचा खूप छान उपयोग होतो. मूल २ वर्षाचं होईपर्यंत ही थेरपी दिली जाते.

संगीतोपचार (music therapy) घेण्यासाठी व्यक्तीला संगीत समजायला किंवा गाता यायला हवं अशी कोणतीच अट नाही. प्रत्येक रुग्णाची मानसिकता, त्याची जडण घडण, सवयी, कामाचे स्वरुप, कौटुंबिक पार्श्वभूमी, शारिरीक स्थिती या सगळ्याची माहिती जाणून घेऊन प्रत्येकासाठी specific संगीत ऐकायला दिलं जातं. रोज रात्री झोपायच्या आधी साधारण २० मिनिटं नित्यनेमाने ऐकायचे आहे. रुग्णाच्या routine प्रमाणे वेळ बदललीही जाऊ शकते. जागेचे बंधन नाही. संगीत हे आपल्या बरोबर कुठेही नेऊ शकतो.

म्युझिक थेरपी मध्ये हिंदुस्तानी शास्त्रीय संगीत आणि वाद्य यांचे खूप मोठे योगदान आहे. बदलती जीवनशैली आणि मानसिकता बघता music therapy / संगीतोपचार ही काळाची गरज आहे यात शंकाच नाही.

**ईशा साने**
९१५२०१७१७०
Music Therapist, Special Educator & Counselor



# आमची शाळा - रचनाशास्त्रातील सौंदर्याविष्कार

शाळा म्हटलं की आपल्या सर्वांच्याच डोळ्यासमोर आपले मित्र, मैत्रिणी, आपले आवडते शिक्षक येतात, त्यांच्याबरोबर घालवलेले अविस्मरणीय क्षण येतात. पण ह्या सर्वांना जोडणारी शाळेची वास्तू हीदेखील एक मूक साक्षीदार असते. ह्या शाळा नामक इमारतीच्या साक्षीने, तिच्याच अवतीभवती, आपल्या बालपणीच्या सर्व कडूगोड आठवणी रेंगाळत असतात.

आमच्या शाळेच्या, म्हणजे माधवराव भागवत हायस्कूलच्या हीरक महोत्सवी वर्षाची नुकतीच सांगता झाली. आता शाळेची नवी इमारत उभी राहतेय पण मला शाळेच्या जुन्या




इमारतीबद्दल सांगायचं आहे.

रस्त्याच्या कोपऱ्यावरची काटकोनातली जागा असल्याने शाळेची चार मजली वास्तू समोरून काहीशी अरुंद आणि मग दोन्ही बाजूंना मोठ्या तिरक्या इमारती एकत्र जोडल्यासारखी, अगदी वैशिष्ट्यपूर्ण होती. रस्त्यावरून दिसणारं आयताकृती आवार सिमेंट कॉंक्रीटचं आणि पाठीमागचं मोठं मैदान मऊ लाल मातीचं होतं. शाळेच्या प्रवेशद्वाराशीच काळ्या पाषाणातली देवीची प्राचीन मूर्ती होती. परीक्षेच्या वेळी आम्ही त्या मूर्तीसमोर घोटाळत असायचो. काहीजण अगदी परीक्षेला जाताना शेवटच्या क्षणी तिथे प्रदक्षिणा पण घालायचे. शाळेला उशीर झालेले विद्यार्थी धावत पळत येऊन पहिल्या मजल्यावरच्या सरस्वतीसमोर प्रार्थना संपेपर्यंत उभे राहायचे. शाळा संपल्यावर आम्ही बरेचजण एक एक पायरी सोडून जिन्यातून धावत खाली उड्या मारत उतरायचो आणि उतरताना प्रत्येक मजल्यावरून दोन्ही बाजूंना असणाऱ्या उभ्या चिंचोळ्या फटींतून बाहेर डोकवायचो. मजल्याच्या उंचीप्रमाणे बाहेरचं दृश्य बदलत जायचं.

शाळेमागच्या पटांगणाच्या एका कोपऱ्यात स्थापना केलेला गदाधारी मारुती, चित्रकलेच्या वर्गातील षटकोनी खिडक्या, रुंद जिने, तिथे मोठ्या फळ्यावर रंगीबेरंगी खडूंनी सुवाच्य अक्षरात लिहिलेले दिनविशेष, सुविचार असं बरंच काही डोळ्यासमोर येतंय.

(वर्गाच्या आराखड्याचा फोटो इथे छापणे)




आमच्या शाळेची अंतर्गत रचना फार सुंदर होती. वर्गांचे आकार अष्टकोनी होते. बाजूच्या दोन्ही भिंतींना असलेल्या उभा तिरप्या फटीतून फळ्यावर उजेड पडायचा. सगळी मुलं साधारणपणे शिक्षकांच्या आसपास बसल्यासारखी वाटतील अशी ती वैशिष्ट्यपूर्ण रचना होती. वर्गात बाई शिकवत असताना, बाहेर पाऊस पडत असला की आमचा एक कान कवितेवर पण डोळा खिडकीतून बाहेर पडणाऱ्या पावसावर असायचा. ती कविता आणि ते दृश्य आम्ही सहजपणे एकमेकात गुंफून टाकायचो. वर्गाचे दार बंद केले तरी हवा कायम खेळती राहायची. दोन वर्गाच्या मधल्या कॉरिडॉरमध्ये भरपूर नैसर्गिक प्रकाश असायचा. हस्तकलेची आणि चित्रकलेची प्रात्यक्षिके सगळीकडे लावलेली असायची. ड्रॉइंग क्लास आणि सायन्स लॅबच्या वर्गात जाताना डावीकडे एक प्रचंड नागचाफ्याचा वृक्ष लक्ष वेधून घ्यायचा. चित्रकलेसाठी वेगळा मोठ्या बाकांचा कक्ष होता. त्याच्या खिडकीतून तर झाडाच्या फांद्या आणि त्यावर लगडलेली फुलं अगदी हाताशी आल्यासारखी वाटत. अर्थात त्या वयात या गोष्टींचं काही अप्रूप वाटत नव्हतं. 'शाळेत हे सगळं असंच तर असतं!! त्यात काय नवल!!' असंच सर्वांना वाटायचं.

पुढे मी आर्किटेक्ट झालो, तेव्हा अभ्यासाचा भाग म्हणून विचार करायला लागल्यावर कळलं की हे सर्व अनुभव मुलांना देण्यासाठी, कोणीतरी खूप खोलवर विचार करून शाळेच्या इमारतीची रचना केली होती.

कर्मधर्मसंयोगाने आमच्या शाळेचे आर्किटेक्ट श्री. मधुसूदन देशपांडे यांच्याकडेच मला पहिला जॉब लागला आणि तेव्हा त्यांच्याकडून मला ह्यातले बारकावे समजले. शाळेची पहिली लहान बैठी इमारत जिथे होती त्याच प्लॉटवर तो नागचाफ्याचा वृक्ष आधीपासूनच होता आणि त्याला तिथेच ठेवून त्याच्याभोवती अतिशय कलात्मक पद्धतीने शाळेची ही नवीन इमारत बांधली होती. त्याला एक सुंदर पारपण बांधला होता. इमारतीचा पाया खणतानाच एक देवीची मूर्ती सापडली आणि तिची स्थापना शाळेच्या मुख्य द्वाराजवळ करण्यात आली. (इथे सोबत दिलेला झाडाचा फोटो घालणे)

१९७० च्या दशकात ह्या तेव्हाच्या तरुण



आर्किटेक्टनी, श्री देशपांडे यांनी, आपले सर्व कलागुण पणाला लावले आणि ही वास्तू निर्माण केली. तो काळ तसाच नाविन्याने भारला होता. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर इतर सर्व क्षेत्रांप्रमाणेच इमारतींच्या रचनेतही आमूलाग्र बदल होऊ लागले होते. फ्रेंच आर्किटेक्टच्या अभिनव कल्पनेतून 'चंदीगड' सारखी नवनवीन शहरे उभी राहात होती. चार्ल्स कोरिया, ह्या भारतीय आर्किटेक्टने नवी मुंबईची रचना सुरू केली. मला वाटतं ह्या सर्व नवनिर्मितीचा प्रभाव पडून श्री. देशपांडे यांनी पार्ल्यात आमच्या शाळेची ही अशी अभिनव वास्तू बांधली.

शिक्षकांबरोबरच ह्या शाळेच्या इमारतीनेही आमच्यावर काही संस्कार केले आहेत आणि

पान १० वर



# सुरेल कलाप्रवास

अर्चना गोरे, विलेपार्ल्यातील प्रसन्न, लाघवी व्यक्तिमत्व, सुप्रसिद्ध गायिका. अलीकडेच आलेल्या गंगुबाई काठीयावाडी या चित्रपटातील 'शिकायत' या प्रसिद्ध झालेल्या गाण्याच्या निमित्ताने मुलाखतीसाठी विचारणा केली असता तिने आनंदाने वेळ काढून प्रदीर्घ मुलाखत दिली. सुप्रसिद्ध चित्रकार, व्यंगचित्रकार 'श्री. श्रीनिवास प्रभुदेसाई' तसेच 'सौ. मधुरा प्रभुदेसाई' यांची ही कलाकार कन्या. आईला गाण्याची खूप आवड. वडील कार्टुनिस्ट, कमर्शियल आर्टिस्ट. आईची



गाण्याची आवड आणि वडिलांची कलात्मक दृष्टी, दोन्ही लेकीत उतरली आहेत. अर्चनाने व्यास संगीत विद्यालयात शास्त्रीय संगीत शिक्षण घेतलं आहे. 'श्रीमती सुहासिनी व्यास' यांच्याकडे सुरुवातीच्या परीक्षा दिल्या. 'श्री मनोहर जोशी' सर यांच्याकडून पुढचं शिक्षण. दोन वर्ष 'श्रीमती आशाताई खाडिलकर' यांच्याकडे प्रशिक्षण. त्यानंतर तेव्हापासून आजपर्यंत 'डॉ. जान्हवी आपटे', ज्या स्वत: अतिशय सुंदर क्लासिकल गातात आणि शिकवतात त्यांच्याकडे शिक्षण चालू आहे. नाट्यसंगीत लालजी देसाई यांच्याकडे, तर कुलदीप सिंग आणि त्यांचा मुलगा जसविंदर सिंग यांच्याकडे गझलसचं शिक्षण घेतलं. एवढं सांगून अर्चना म्हणते, "प्रथम गुरु आणि टिकाकार ही माझी आई आहे. सुगम गाणं सादर करताना त्यातला जो भाव असतो तो समजून गाणं, हे आईने शिकवलं आहे".

अर्चनाचं शालेय शिक्षण विलेपार्ले येथील जी बी ई एस शाळेत झालं. शाळेत गाण्याला पोषक वातावरण नव्हतं. मात्र काव्यवाचन , निबंध, तसेच विविध खेळांच्या स्पर्धा शाळेमध्ये घेतल्या जात. त्यांमध्ये तिने भाग घेऊन बक्षीसं मिळवली. अकरावीत डहाणूकर कॉलेजमध्ये आल्यापासून गाण्याला खूप वाव मिळाला. आंतरकॉलेज स्पर्धांकरिता 'श्रीमती सराफ मॅडम' आणि 'श्री केशव परांजपे सर' यांनी खूप प्रोत्साहन दिलं. सगळ्या स्पर्धांमध्ये उतरवलं. सगळीकडे अर्चना जिंकत गेली. भरपूर बक्षीसं मिळवली. कॉलेजातून असं प्रोत्साहनात्मक वातावरण असल्याने लक्ष गाण्यावर जास्त केंद्रित झालं.

साधारण बारावीत असल्यापासून गाण्याचे व्यावसायिक कार्यक्रम करायला सुरुवात केली. 'श्री अनिल हर्डीकर' यांच्याबरोबर एका घरगुती मैफिलीने सुरुवात झाली. आम्ही लटिके ना बोलू या 'विक्रम वाटवे' दिग्दर्शित नाटकातून नाट्यसंगीत सादर करीत असे. 'श्रीधरजी फडके' यांच्या कार्यक्रमांमध्ये त्यांची सहगायिका म्हणून जवळपास 300 कार्यक्रम केले त्याचबरोबर विविध संस्थांसाठी गीतकार, संगीतकार, गायक, गायिका, अशा वेगवेगळ्या थीम्स घेऊन कार्यक्रम केले. केशव परांजपे सरांच्या 'स्वरमाऊली' संस्थेसाठी देखील गात असे. त्यांचे कार्यक्रम शास्त्रीय संगीतावर आधारित असत. त्यामुळे चांगलं संगीत ऐकायला मिळालं. साऊंड इंजीनियरिंग करणाऱ्या मुलांच्या गाण्यांमध्ये गायची संधी मिळाली. या अशा गोष्टींचा पुढे खूप फायदा झाला. लीडरशिपचा अनुभव मिळाला. कार्यक्रम चांगल्या प्रकारे कसे ऑर्गनाईज करावेत हा पाया मिळाला.

गुरुकुल

२००८ मध्ये अर्चनाच्या नावाने आर्च एंटरप्राईजेस या संस्थेची स्थापना झाली. या संस्थेतर्फे वेगवेगळे कार्यक्रम होत असतात. यात सुगम संगीताबरोबरच वाढदिवसांसारखे घरगुती कार्यक्रम, गाण्याच्या सीडीज, पुस्तक यांचे प्रकाशन, असे कार्यक्रम होतात. श्रेया घोषाल हिचा मुंबईतील पहिला भव्य कार्यक्रम आर्च एंटरप्राईजेस तर्फे झाला. विनीत आणि अर्चना कॉलेज मधील मित्र. विनीत उत्तम वक्ता, निवेदक तसंच कार्यक्रमांचे आयोजक आहेत. आपली रेल्वेतील नोकरी सांभाळून वेगवेगळे कार्यक्रम करीत असतात. कॉलेजमध्ये असताना कार्यक्रमांमध्ये निवेदन करीत असत आणि अर्चना गात असे. या मैत्रीचं पुढे प्रीतीत रूपांतर आणि त्याची परिणीती विवाहात झाली.

आजच्या काळात आपल्या पाल्याचे करिअर घडवण्यासाठी पालक सुरुवातीपासून सजग असतात. अर्चनाच्या बाबतीत असं घडलं नाही. त्यावेळी इतक्या गोष्टी चालू होत्या, आवडत होत्या, डान्स, मिमिक्री, गाणं की शिकवणं.. करिअर निश्चित करेपर्यंत बराच काळ गेला. आई-वडिलांनी अर्चनाला जी गोष्ट आवडेल ती प्रत्येक गोष्ट शिकण्यात प्रोत्साहन दिलं. शास्त्रीय, सुगम संगीताबरोबर वेस्टर्न म्युझिक, भारतीय कथक नृत्याबरोबर वेस्टन डान्स, मेहंदी, इतकंच नव्हे तर फोटोग्राफी देखील. अर्चना म्हणते, "तुम्ही कोणतंही क्षेत्र निवडा. पण आपला छंद देखील जोपासा म्हणजे आयुष्यात तजेला राहतो".

गुरु बद्दल बोलताना अर्चना म्हणते, "दुर्दैवाने या पिढीचे यूट्यूब, गूगल, इंटरनेट हे शिक्षक झाले आहेत त्यामुळे मुलांच्या मनात खूप मोठा गोंधळ असतो. प्रत्यक्षात योग्य वेळी योग्य व्यक्ती गुरु म्हणून आयुष्यात येणं ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. जे तुमच्या प्रकृतीला झेपेल, जे चांगलं वाटेल, त्या पद्धतीचं शिक्षण तुम्हाला गुरूकडून मिळणं, सकारात्मकता आणि आशीर्वाद मिळणं, या अतिशय महत्वाच्या गोष्टी आहेत. बाकी गोष्टी नेटवरून शिकता येतात पण गाण्यातला भाव समजावणारा तो गुरुच. ती म्हणते, मला गळ्याला काय झेपतंय, काय सूट होतंय हे सांगणारे गुरु भेटत गेले आणि मग जाणवलं, आता आपली तयारी झाली आहे. आता आपण करूया. असं ठरवून सोलो प्रोग्रॅम केला".

अर्चनाने आजवर भरपूर सिरीयल्सची गाणी, ताल सारख्या big banner चित्रपटांसाठी कोरस, अशी भरपूर कामं केली आहेत. मराठी नाटक तसंच चित्रपटांसाठी गायली आहे. समुद्र नाटकात चिन्मय मांडलेकरांनी खास अर्चनाच्या आवाजातील ठुमरी घेतली आहे. कथक नृत्यांगना राजश्री शिर्के यांच्या नृत्य नाट्यासाठी अर्चना गात असे. त्यानंतर आशाताई जोगळेकर यांच्यासाठीही ती गाऊ लागली. कुणाल ताटे यांच्या नृत्य शाळेत मराठी आरंगेत्रम् चे अनेक कार्यक्रम केले आहेत. असं कितीही काम केलं तरी प्रत्येक कलाकाराला आपल्या स्वत:च्या नावावर एक गाणं हवं असतं. भन्साली प्रॉडक्शन मध्ये नवीन चित्रपट 'गंगुबाई काठीयावाडी' या चित्रपटातील एका गाण्यासाठी गायिकेचा शोध चालू होता. विशिष्ट काळातील या गीतासाठी आवाजाचा टोन, ठसका, गझल शिक्षणामुळे आलेले स्वच्छ सुयोग्य उच्चार यामुळे तिचा आवाज



भन्सालींना आवडला आणि अनेक आवाजांतून अर्चनाची निवड झाली. विशेष म्हणजे या गाण्याच्या शूटिंगला उपस्थित राहायची संधी अर्चनाला मिळाली. गाण्याच्या शेवटच्या भागाचं शूटिंग होताना अर्चना स्वत: मायक्रोफोन घेऊन गायली आहे. भन्सालींनी स्वत: भेटून तिच्या आवाजाचं कौतुक केलं आहे. अर्चनासाठी हा रोमांचक अनुभव होता. गाणं जगभर पोचल्याने Fan following म्हणजे काय याचा अनुभव घेतला. ती म्हणते , "thoroughly enjoyed the process. My dream came true".

अर्चनाला गीत रामायण अतिशय प्रिय आहे. म्युझिक अरेंजर आनंद सहस्त्रबुद्धे यांनी एक कल्पना सुचवली की आपण लहान मुलांकडून गीत रामायण का नाही गाऊन घेऊ ? कारण लव-कुश ही लहान मुलंच होती. अर्चना आणि सह कलाकार, गायक मित्र मंदार आपटे यांनी छोट्या मुलांकडून गीता रामायणाची गाणी गाऊन घेतली. चांगले शब्द, चांगलं संगीत, मुलांनीही गाणी, उच्चार उत्तम प्रकारे उचलले. हे पाहून सर्वांना अतिशय आनंद आणि समाधान या कार्यक्रमातून मिळालं. या निमित्ताने मुलांना आपल्या महाकाव्यांची ओळख झाली. नंतर रामायणावरती एक वर्कशॉपही घेतलं. तेही मुलांनी खूप एन्जॉय केलं. या मुलांमध्ये अर्चनाचा मुलगा हर्षवर्धन देखील होता. हर्षवर्धन लहान असताना अर्चनाने कार्यक्रमांतून थोडा ब्रेक घेतला. त्यानंतर पुन्हा कार्यक्रम, रेकॉर्डिंग वगैरे चालू झाल्यावर अर्चनाच्या आई आणि सासूबाईंनी त्याला उत्तम प्रकारे सांभाळलं. हर्षवर्धन आता नववीत आहे. त्याचे आई वडील त्यांच्या व्यवसायामुळे अनिश्चित वेळांसाठी बाहेर असतात. त्यामुळे तो संपूर्ण स्वावलंबी झाला आहे. आज आपला अभ्यास सांभाळून आईकडे गाणं शिकतो आहे.

अर्चनाने आवड म्हणून फोटोग्राफीचा कोर्स केला होता. पण तिला दिग्दर्शनात जास्त रस आहे. रमाबाई परांजपे शाळेच्या पंच्याहत्तरी निमित्ताने तिने एक छोटी फिल्म बनवली. त्यानंतर पिपाटा संस्थेच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त एक फिल्म, बाबू वडापावला पन्नास वर्षं पूर्ण झाली त्यानिमित्ताने एक फिल्म, गाण्यांचे व्हिडिओज असे तिने आत्तापर्यंत शंभर एक व्हिडिओज केले आहेत. मैत्रिण ज्योती अळवणी यांच्या कथांवर दोन शॉर्ट फिल्म्स सेलिब्रिटीजना घेऊन केल्या. सिनेमाप्रमाणेच सगळे संस्कार केले. त्या फिल्मला उत्कृष्ट दिग्दर्शनाचा पुरस्कार मिळाला आहे. सध्या लग्नाच्या प्रीवेड शूटचं वेड आहे. त्यासाठी अर्चना, सहकलाकार मंदार आपटें सह गाणी करून देते.

संगीतकार प्रदीप वर्तक यांच्या प्रचलित आणि नवीन भावगीतांचे seasons सध्या अर्चना आणि मंदार करत आहेत..त्यांचा चौथा season आता भेटीला येत आहे. त्यात अर्चना गायली आहे आणि व्हिडिओज ही केले आहेत. अर्चनाचं स्वत:चं यूट्यूब चॅनल आहे त्यावर ती सगळे व्हिडिओज, गाणी पोस्ट करत असते.

पुढे काय? असं विचारल्यावर अर्चना म्हणते, गाणं तर चालू राहीलच. पण दिग्दर्शन या आवडत्या क्षेत्रात नवनवीन प्रयोग करून पाहाण्याची इच्छा आहे. अर्चनाकडून उत्तमोत्तम फिल्म्स बनोत आणि आपल्याला त्या पाहायला मिळोत ही शुभेच्छा!!

अनुश्री क्षीरसागर
९८२०५०९७६२

पान ८ वरून

### आमची शाळा - .......

थोडं धिटाईने आणखी पुढे जाऊन बोलायचं म्हटलं तर बहुतेकांना अज्ञात असलेल्या या आर्किटेक्टने ह्या वास्तूच्या माध्यमातून आमच्यावर नकळतपणे सौंदर्याचे, रचनाशास्त्राचे आणि पर्यायाने समृद्ध अनुभवांचे संस्कार केले आहेत.
आजवर मी देशविदेशातील कित्येक शाळा बघितल्या, काही महाविद्यालयांची रचनाही केली पण अशा प्रकारची रचना माझ्या पाहण्यात कधी आली नाही.

एखाद्या वास्तूची निर्मिती आपण त्या राजाच्या नावाने लक्षात ठेवतो, जसा 'ताजमहाल' हा शहाजहानने बांधला. वेरूळचं 'कैलास लेणं' हे राष्ट्रकूटांनी बांधलं असं आपण म्हणतो. तसंच विलेपार्ले गाव हे श्री. बाबुराव परांजपे यांनी वसवलं याचाही आपल्याला अभिमान आहे. पण या महत्त्वाच्या कामात ज्या अज्ञात हातांनी इथल्या निरनिराळ्या वास्तूंची रचना केली त्यांचीही आठवण आपण ठेवायला हवी.

इमारतींच्या बांधकामासंदर्भात काही त्रिकालाबाधित सत्य आहेत, जसे की बांधकामाला होणारा उशीर (deadlines), त्यासाठी सुरू असलेली घाई, ऐन बांधकाम सुरू असताना येणारी पैशाची चणचण (Budget), 'काहीही करा पण आजच्या आज हे काम झालंच पाहिजे', तुम्हाला जमत नसेल तर काम सोडून जा, अशा वरिष्ठांकडून आलेल्या धमक्या! ह्या सर्वातून एखादा कलाकार काहीतरी नवीन, देखणी निर्मिती करतो तेव्हा मन स्तिमित होतं. माझ्या आयुष्यातील प्रत्येक पायरीवर कळत नकळतपणे साथ देणाऱ्या त्या सर्व ज्ञात आणि अज्ञात कलाकारांना नतमस्तक प्रणाम.

**सांबप्रसाद पिंगे**
९८२०३३४१९५

# हॉटेल ताज महाल

ब्रिटिश आमदानीत हॉटेल्स, क्लब आदी ठिकाणी फक्त युरोपियनांनाच प्रवेश होता. स्थानिक भारतीय माणसांना तिथे जाणे निषेध होते. या अपमानकारक वास्तवाचा विचार करून देशभक्त उद्योगपती श्री. जमशेदजी टाटांनी एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात व विसाव्या शतकाच्या आरंभीला एका आलिशान भव्य हॉटेलची निर्मिती केली. १९०३ साली बांधून पूर्ण झालेले हे हॉटेल सर्व धर्मीयांसाठी खुले होते. या आलिशान वास्तूच्या खुल्या वातावरणात व्यापार उदीम व सांस्कृतिक देवाणघेवाण वृद्धिंगत तर झालीच. पण नावातच ताज असलेले हे हॉटेल मुंबईच्या मस्तकावरील मुकुटमणी झाले. ताज हॉटेल शेजारील आधुनिक बहुमजली इमारत १९७३ साली उभारलेली आहे.



मूळच्या ताज हॉटेलचे डिझाईन श्री. जमशेटजी यांनी रावसाहेब सिताराम खंडेराव वैद्य यांच्या सहकार्याने तयार केले. हे रावसाहेब वैद्य आताच्या महाराष्ट्र पोलीस मुख्यालय इमारती वरती ओव्हरसीयर होते. त्यानंतर ते मुंबई शहराचे रेसिडेंट इंजिनियर झाले. मुंबई महानगरपालिकेच्या इमारतीच्या बांधकामाची जबाबदारी त्यांनीच पार पाडली. रावसाहेबांच्या निधनानंतर मे. गोसलिंग चेंबर्स अँड फ्रिचली या वास्तु विशारद संस्थेच्या श्री. चेंबर्स यांनी आर्किटेक्ट म्हणून काम पाहिले. मुख्य आखणीतील बहुतेक भाग तसाच ठेवत त्यांनी अनेक बदलही केले. त्यात घुमटाच्या डिझाईन मध्ये केलेले बदल मुख्यत: आहेत.

जुन्या ताजच्या बांधणी शैलीचे वर्णन काहींनी मुरीश शैली तर काहींनी ईस्टर्न किंवा इंडोसारसेनिक असे केले असले तरी ही वास्तू कोणत्याच एका शैलीत बांधलेली नाही. जमशेदजींनी जुनी गॉथिक शैली नाकारून प्रामुख्याने भारतीय वळणाची शैली अंगीकारली. स्थानिक दृष्टिकोन आणि आलिशान हॉटेलच्या उभारणीतील प्रचलित पाश्चिमात्य संकल्पना याचा संगम येथे आढळतो. सार्वजनिक स्वरूपाच्या मोठ्या वास्तूंत असलेल्या पद्धतीही घडणीत दिसतात. व्हिक्टोरिया टर्मिनस, पश्चिम रेल्वेचे मुख्यालय, महानगरपालिकेची वास्तू व महाराष्ट्र पोलीस मुख्यालय या वास्तूंच्या बांधणीतील साम्यही ताज मध्ये आढळते. आतले जिने, कांद्याच्या आकाराचे लहान घुमट, कमानी, सज्जे व बांधकामात वापरलेले स्थानिक साहित्य या गोष्टी प्रकर्षाने साम्य दाखवणाऱ्या आहेत. ही इमारत मुंबई शहरातील भव्य, आलिशान,श्रीमंती निवासी हॉटेल या मूळ उद्देशानेच आखणी करून बांधलेली आहे.


भारतीयांचे स्वत्व जपण्यासाठी श्री. जमशेटजींनी बांधलेली ही वास्तू आजही मुंबईची शान ठरत आहे. पण २६/११ च्या हल्ल्यानंतर झालेल्या प्रचंड नुकसानी व अग्नितांडवातूनही ती ताऊन सुलाखून निघाली आहे. ताजच्या जळणाऱ्या घुमटाकडे बोट दाखवत श्री. रतन टाटांनी 'मी पुन्हा ही वास्तू पूर्ववत दिमाखात उभी करेन' हा दिलेला शब्द खरा करून दाखवला. आजही टाटा घराणे आपल्या देशाशी व निष्ठांशी किती प्रामाणिक आहे याचाच हा पुरावा आहे. म्हणून आज हॉटेल ताज महाल हे केवळ मुंबईचेच नाही तर संपूर्ण देशाचे गौरवस्थान बनले आहे.

**संगीता बेहेरे**
९८६७७५८३१०
**(फोर्टमध्ये फिरताना - भालचंद्र हर्डीकर)**

मनोरंजन विश्व

# दगडी चाळ २

हल्ली हिंदी चित्रपटांप्रमाणे मराठी चित्रपटांच्या सिक्वलचा ट्रेंड आला आहे. मुंबई पुणे मुंबई, टाईमपास या चित्रपटांप्रमाणे आता ऑगस्ट





महिन्यात 'दगडी चाळ ' या चित्रपटाचे दुसरे पर्व अर्थात 'दगडी चाळ २' आपल्या भेटीला येणार आहे. 'दगडी चाळ १' ला प्रेक्षकांनी प्रचंड प्रतिसाद दिल्यानंतर आता या चित्रपटाचे दुसरे पर्व १८ ऑगस्ट रोजी चित्रपटगृहात झळकणार आहे. या चित्रपटाचे नवे पोस्टर नुकतेच सोशल मीडियावर प्रदर्शित झाले असून यात पुन्हा एकदा अंकुश चौधरी आपल्याला सूर्याच्या भूमिकेत दिसतोय. 'डॅडी' आणि सूर्याचे नाते आपण याआधीच पाहिले. 'डॅडीं'च्या गुंडांसोबत होणाऱ्या भांडणानंतर सूर्या-डॅडींची होणारी मांडवली, 'डोकॅलिटी' वापरून काम करणारा 'सूर्या' डॅडींचा उजवा हात बनला, त्यात सूर्याचा कौटुंबिक ताण, हे सगळं आपण यापूर्वी पाहिलं.मात्र यावेळी 'आय हेट यू डॅडी' असे म्हणत, सूर्याच्या चेहऱ्यावर प्रचंड राग दिसतोय, आता तो डॅडींचा तिरस्कार का करतोय?, याचे उत्तर 'दगडी चाळ २' पाहिल्यावरच मिळेल.या चित्रपटात मकरंद देशपांडे 'डॅडीं'ची भूमिका साकारत आहेत मंगलमूर्ती फिल्म्स आणि संगीता अहिर निर्मित, चंद्रकांत कणसे दिग्दर्शित 'दगडी चाळ २' हा चित्रपट १८ ऑगस्ट रोजी आपल्या भेटीला येत आहे.

# समायरा - एका असाधारण प्रवासाची गोष्ट

सध्या विविध विषयांवरील मराठी चित्रपट आपली उत्कंठा वाढवत आहेत. ऋषी श्रीकृष्ण देशपांडे दिग्दर्शित 'समायरा' या चित्रपटाची नुकतीच सोशल मीडियावर घोषणा करण्यात आली आहे. येत्या २६ ऑगस्ट रोजी 'समायरा' हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. पोस्टरमध्ये केतकी नारायण अव्हेंजर चालवताना दिसत असून तिच्या चेहऱ्यावर एक ध्येय साध्य करण्याचा आत्मविश्वास दिसत आहे. तिच्या ध्येयापर्यंतचा हा असाधारण प्रवास आपल्याला या चित्रपटात पाहायला मिळणार आहे.

'समायरा'चे दिग्दर्शक ऋषी देशपांडे म्हणतात, "प्रत्येक जण आयुष्य जगण्यासाठी एक प्रवास करत असतो. तसाच एक असाधारण प्रवास 'समायरा'चाही असणार आहे. तिचा हा प्रवास तिचे ध्येय साध्य करणार का, हे लवकरच प्रेक्षकांना कळणार आहे. सध्या मराठी चित्रपटसृष्टीत अनेक नवनवीन विषय हाताळले जात आहेत. ही कथाही खूप वेगळी आहे. 'समायरा'चा हा प्रवास प्रेक्षकांना नक्कीच सकारात्मकता देईल".

ग्लोबल सेवा एलएलपी प्रस्तुत, अद्योत फिल्म्सच्या सहयोगाने, या चित्रपटाची निर्मिती




डॉ. जगन्नाथ सुरपुरे, रतन सुरपुरे, शशिकांत पनत, योगेश आळंदकर आणि ऋषी श्रीकृष्ण देशपांडे यांनी केली आहे. या चित्रपटाची पटकथा आणि संवाद सुमित विलास तांबे यांचे आहेत.

**गणेश आचवल**
९८२१२६८३९१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# विदर्भ वडापाव

सन १९७२ पासून चव परंपरेची

## सन १९७२ पासून यशस्वी व्यवसायीक असलेल्या

# विर्दभ वडापावची नवीन शाखा

**दुकान क्र. १, मराठा भुवन, राम मंदिराच्या बाजूला, सुभाष रोड, विलेपार्ले (पूर्व), मुंबई - ४०० ०५७ येथे**

**खासदार सौ. पूनमताई महाजन व**
**आमदार ॲड. श्री. परागजी अळवणी यांच्या हस्ते उद्घाटन**

# लवकरच सुरु होत आहे...

**सोमवार, दि. १५ ऑगस्ट २०२२**



**सौ. पूनमजी महाजन**
(लोकनेत्या)
(खासदार - लोकसभा भारत सरकार)

विदर्भ वडापाव
सन १९७२ पासून चव परंपरेची
५०
परिश्रमाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष

**सर्वांचे**
**हार्दिक स्वागत !**



**ॲड. श्री. परागजी अळवणी**
(लोकनेते)
(आमदार - आमदार महाराष्ट्र सरकार)

**संचालक मंडळ, विदर्भ वडापाव**

**श्री. सुनिल रमेश वाघ | सौ. अश्विनी सुनिल वाघ | कु. मानस सुनिल वाघ**

# लोकमान्य सेवा संघ, पारले १०३ वा गणेशोत्सव

## कालावधी - बुधवार दि. ३१ ऑगस्ट ते शुक्रवार दि. ९ सप्टेंबर २०२२

### कार्यक्रम पत्रिका

**सर्व सांस्कृतिक कार्यक्रमांची वेळ**
**सायं. ७.३० वाजता**

**बुध. दि. ३१ ऑगस्ट**

सकाळी - श्रींची प्रतिष्ठापना सकाळी ९.३०

**गुरु. दि. १ सप्टेंबर**

कीर्तन – कीर्तनकार श्री.अविनाश परांजपे

**शुक्र. दि. २ सप्टेंबर**

झक्कास – सुरेल मराठी-हिंदी गाणी (कराओके) सादरकर्ते – TMG - The Timeless Melodies Group

**शनि. दि. ३ सप्टेंबर**

नृत्योत्सव -

सहभागी नृत्यांगना - पूजा काळे, अर्पिता साठ्ये, सोनाली कामत, वैशाली पोतदार, दिशा देसाई आणि कोमल खडसे

**रवि. दि. ४ सप्टेंबर**

महाराष्ट्राची हास्यजत्रा फेम समीर चौघुले यांच्याशी मनमोकळ्या गप्पा

संवादक – चित्रा वाघ

**सोम. दि. ५ सप्टेंबर**

स्टँड अप कॉमेडी 'शुभ मंगल सावधान' – सादरकर्ते मंदार भिडे

**मंगळ. दि. ६ सप्टेंबर**

क्रिकेटच्या गप्पा 'मैदानापासून मैदानाबाहेर व्हाया ड्रेसिंग रूम' - द्वारकानाथ संझगिरी

**बुध. दि. ७ सप्टेंबर**

'आम्ही सखे शेजारी' आंतर-सोसायटी धमाल अंताक्षरी स्पर्धा - अंतिम फेरी

**गुरु. दि. ८ सप्टेंबर**

'अनुभूती' – गायन, वादन व नृत्याने नटलेला विशेष कार्यक्रम

संकल्पना दिग्दर्शन – सुप्रसिद्ध तबलावादक पं.मुकुंदराज देव

**शुक्र. दि. ९ सप्टेंबर**

श्रींची मिरवणूक आणि विसर्जन दु. ३.३०

### धार्मिक कार्यक्रम

श्रींची पूजा व आरती रोज सकाळी ८.०० वाजता व सायंकाळी ६.०० वाजता

**शनि. दि. ३ सप्टेंबर**

सहस्त्रावर्तन सकाळी ८.३० वाजता

**मंगळ दि. ६ सप्टेंबर**

स्वरदा भजनी मंडळ यांचा भजनाचा कार्यक्रम दुपारी - ४.०० ते ५.००

**बुध. दि. ७ सप्टेंबर**

संपूर्ण गीता वाचन - दुपारी - ३.३० ते ५.३०

# एपिलॉग सुपरहीट

ज्योती अळवणी यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये लोकप्रतिनिधी म्हणून विले पार्ले पूर्व येथील जवाबदारी २०१२ ते २०२२ अशी दहा वर्षे सांभाळली. त्यासोबतच त्या अनेक वर्षं लेखन देखील करत आहेत.त्यांनी लिहिलेलं कथा विविधा हे सात कथांचा संग्रह असलेलं पुस्तक ग्रंथाली प्रकाशनातर्फे २०१८ मध्ये प्रकाशित झालं होतं. त्यानंतर आता २०२२ मध्ये त्यांनी अजून एक वेगळा प्रयोग केला आहे. त्यांनी लिहिलेल्या चार भय कथांवर आधारित हिंदी वेब फिल्म एपिलॉग त्यांनी स्वत: निर्मित केली आणि २९ जुलैला फिल्लांबाज फिल्म कंपनी या youTube चॅनेलवर रिलीज केली आहे. पहिलीच फिल्म असूनही भय कथा निवडताना त्यांच्या मनात खूप धाकधूक होती. पण त्यांच्या फिल्मच्या डायरेक्टरला; कृणाल राणेला; खात्री होती की वेगळ्या प्रकारे ट्रीटमेंट दिलेली ही फिल्म सगळ्यांनाच नक्की आवडेल; आणि झालं देखील तसंच. केवळ अकरा दिवसांमध्ये एपिलॉगला पंचावन्न हजारांच्या वर viewership मिळाली आहे. केवळ ४८ तासांमध्ये आणि एकाच लोकेशनवर शूट केलेली ही अनेक ॲक्टर्स असलेली फिल्म आज youTube वर अत्यंत लोकप्रिय झाली आहे.

